CNRNo. MHSI010008162022

**(सेशन केस नं.५४/२०२२ मधील नि. २३ वरील आदेश)**

या प्रकरणातील जामिनदार भिकाजी पांडुरंग आडनाईक हे राहा. यवलूज, गौळवाडा, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर येथील रहीवासी आहेत व आरोपी महिपाल कुरसिंग यादव उर्फ महिपाल कुवरपांल हा जिल्हा रामपूर, राज्य उत्तरप्रदेश इथला रहाणारा आहे. जेव्हा जामिनदाराला आरोपी कुठला रहाणारा आहे असे विचारले असता, त्याला गावाचे नाव व जिल्हा सांगता आला नाही. एकदा उत्तरप्रदेश व एकदा बिहार इथला रहाणारा आहे असे मोघम उत्तर दिले. त्यांची ओळख कशी व कधी झाली याबाबत त्याने समाधानकारक उत्तर दिलेले नाही. आरोपीचा भाऊ सोनू हा हजर होता. त्याच्याकडे सुध्दा जामिनदाराबाबत माहिती घेतली असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही. इथे हे नमूद करणे महत्वाचे आहे की, सदरचा जामिन पूर्ण करण्यासाठी ॲड. अभयसिंग पाटील, राहा. कोल्हापूर हे आलेले आहेत व जामिनदार सुध्दा कोल्हापूर जिल्हयातील आहे. असे दिसून येते की, आरोपी ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग स्थळसिमेत काम करायचा. कोल्हापूर जिल्हयात आरोपीने कधीही काम केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. आरोपीवर कलम ३७६ (१) व ३७६ (२) (m) या सारख्या गंभीर गुन्हयांचा आरोप आहे. त्यामुळे योग्य जामिनदार स्विकारणेची जबाबदारी या न्यायालयाची आहे. सर्व परिस्थितींचा विचार करता जामिनदाराने दिलेला जामिन नाकारण्यात येत आहे. म्हणून पुढील आदेश.

**<u>आदेश</u>**

जामिनदार भिकाजी पांडुरंग आडनाईक याने या प्रकरणात दिलेला जामिन नाकारण्यात येत आहे.

सही/—

दिनांक :— ११/१२/२०२३

सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग—ओरोस.